



॥ श्री ॥

# दासबोध चिंतनिका

ग्रंथाच्या प्रास्ताविकातील काही भाग -

शास्त्रीय पारमार्थिक ग्रंथ एका चौकटीत बंदिस्त असावा अशी ग्रंथरचना शास्त्राची मर्यादा आहे. त्या चौकटीला अनुबंध असे म्हणतात. या बंदिस्तीमुळे ग्रंथाच्या रचनेत अस्ताव्यस्तपणा येत नाही व अभ्यास करणाऱ्यालाही त्या चौकटीच्या अनुरोधाने अभ्यास करता येतो.

१) अधिकारी - ज्याला डोळ्यासमोर ठेवून ग्रंथरचना केलेली असते त्याला अधिकारी असे म्हणतात. अज्ञानी, दुःखी, भ्रांत, आळशी, अवगुणी, अवलक्षणी, निंदक, बद्ध, मूर्ख व पतित हे सर्व या ग्रंथाचे अधिकारी आहेत.

२) विषय - भक्तिचेन योगे देव। निश्चये पावती मानव। ऐसा आहे अभिप्राव। ईये ग्रंथी॥१-१-४॥

३) प्रयोजन - १ - व्यावहारिक प्रयोजन -

आता श्रवण केलियाचे फळ। क्रिया पालटे तात्काळ। तुटे संशयाचे मूळ। येकसरा॥१-१-२८॥

४) संबंध - हा केवळ तांत्रिक विषय आहे. प्रयोज्य - प्रयोजन संबंध - ज्याच्यासाठी प्रयोजन आहे त्याला प्रयोज्य असे म्हणतात. त्याचा प्रयोजनाशी जो संबंध आहे तो प्रयोज्य-प्रयोजन संबंध.

## श्रीदासबोधाची षड् लिंगे

लिंग म्हणजे अभ्यासाचा आधार. पारमार्थिक शास्त्रीय ग्रंथाच्या अभ्यासाचे सहा आधार असतात.

१) उपक्रम व उपसंहार - प्रतिपाद्य विषयाची जेथे सुरवात केलेली असते त्याला उपक्रम असे म्हणतात. तो सांगून पूर्ण झाला की तोच उपसंहार होय.

नवविधा भक्ती आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण। बहुधा अध्यात्मनिरोपण। निरोपिले॥१-१-३॥

२) अभ्यास - केलेली गोष्ट पुनः पुनः करणे म्हणजे अभ्यास. म्हणून ग्रंथाचाही अभ्यास पुनः पुनः करावा.

वीस दशक दोनीसे समास। साधके पाहावे सावकास। विवरतां विशेषाविशेष। कळो लागे॥२०-१०-३२॥

३) अपूर्वता - या ग्रंथाचे फळ अन्यत्र मिळत नाही हीच याची अपूर्वता. मुक्तीचे प्रतिपादन अध्यात्मिक ग्रंथ सोडून अन्य कोणत्याही ग्रंथात नसते.

अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाही जन्ममृत्याची। आणि पदवी सायोज्यतेची। सन्निधची लाभे॥१-९-१३॥

४) फळ - ग्रंथाचे प्रयोजन सिद्ध झाले की त्याला फळ असे म्हणतात.

जालें साधनांचे फळ। संसार जाला सफळ। निर्गुणब्रह्म तें निश्चळ। अंतरी बिंबले॥२-१०-२६॥

५) अर्थवाद - एखाद्या ग्रंथाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जेव्हा त्याची अवाजवी स्तुती केली जाते तेव्हा त्याला अर्थवाद म्हणतात.

नासे अज्ञान दुःख भ्रांती। सीघ्रची येथे ज्ञानप्राप्ती। ऐसी आहे फळश्रुती। ईये ग्रंथी॥१-१-३०॥

६) युक्ती - सिद्धांत सिद्ध करण्यासाठी ज्या उदाहरणाचा उपयोग केला जातो त्याला युक्ती असे म्हणतात.

स्वप्नी जें जें देखीलें। तें तें जागृतीस उडाले। सहजची अनुर्वाच्य जाले। बोलता न ये॥२०-१०-२८॥

दासबोध अनुबंध व षडलिंगे दासबोधातीलच इतर तत्सम ओव्यांनी सिद्ध होऊ शकतो.

## चिंतनापूर्वी

श्रीदासबोध हे श्रीसमर्थ रामदास स्वामींचे साधुकाव्य आहे. मुख्यत्वे या रचनेमुळेच 'कवी वाल्मिका सारिखा मान्य ऐसा।' असे त्यांचे विषयी म्हटले गेले. साधुकाव्याचे लक्षण पुढील प्रमाणे सांगितले आहे. -

धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च। करोति कीर्तिप्रीतिंच साधुकाव्यं निवेषणम् ॥ (अवलोक टीका)

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, कला, रसिकत्व, कीर्ती व प्रेम यांची प्राप्ती करून देणाऱ्या काव्याला साधुकाव्य असे म्हणतात.

अशा या साधुकाव्याचा, साधकाच्या (दशक ५ समास ९) दृष्टीने अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे. या अभ्यासासाठी निश्चित केलेली तत्त्वे पुढील प्रमाणे. १) दासबोधाची संहिता छापली नाही. ती बहुतेक सर्व साधकांकडे असते. मूळ संहितेसह चिंतनिकेचा अभ्यास करावा. २) जेथे अद्वैताचे गूढ सिद्धान्त आहेत त्या सिद्धान्तांच्या प्रक्रिया सोप्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे व अशा ओव्यांचे विस्तृत अर्थ दिले आहेत. ३) जेथे सर्वांच्या नित्य परिचयाचे विषय आहेत व जो भाग सोपा व पुनःपुनः लिहिलेला आहे तेथे गोषवारा देऊन तो किती ओव्यांचा झाला ती ओवी संख्या दिली आहे. ४) जरूर तेथे उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे, ज्ञानेश्वरी, तुकाराम महाराजांची गाथा व नाथ भागवताचे संदर्भ दिले आहेत. श्रीगणेशगीता, यमगीता वगैरे ग्रंथ आज फारसे प्रचलित नसल्याने व त्यातील तत्त्वज्ञानाचा समावेश वरील ग्रंथात असल्याने त्यांचे संदर्भ दिले नाहीत. ५) मधूनमधून जरूर तेथे काही विशिष्ट ओव्यांचे विस्तृत स्पष्टीकरण दिले आहे. ६) श्रीदासबोधाच्या उपलब्ध प्रतीतील पाठभेदामुळे साधुकाव्याच्या हेतूची हानी होत नसल्याने पाठभेद चर्चा टाळली आहे. ७) श्रीदासबोधाच्या अध्यात्मिक तत्त्वज्ञानात पुनरुक्ती असल्याने एकदा एक विषयाचा शक्यतर पूर्ण विचार केल्यानंतर पुनः तो विषय आला असता, तो तसाच सोडून दिला आहे. श्रीदासबोधाची रचना काहीशी विस्कळीत असल्याने दशक व समासात विचाराच्या प्रवाहाचे सातत्य व संगती असल्याचे ओढून ताणून दाखविण्याचा प्रयत्न केला नाही.

पुरस्कार - द्वारा श्री द्वा. वा. केळकर, संयोजक, पत्रद्वारा दासबोध अभ्यास -

--- श्रीसमर्थ रामदासांसारख्या साक्षात्कारी संताने लिहिलेला दासबोधासारखा अलौकिक ग्रंथ डॉ. देशमुख यांच्यासारख्या थोर विचारवंत, आचारसंपन्न, बहुश्रुत प्रवचनकाराने प्रगट केलेले त्यावरील चिंतन, आणि ते लिपीबद्ध करणारे श्री. सुनील चिंचोलकर यांच्यासारखे सिध्दहस्त, विरागीवृत्तीचे 'लेखकू' असा हा त्रिवेणी संगमाचा योग या ग्रंथनिर्मितीच्या निमित्ताने झाला आहे. या अपूर्व घटनेची तुलनाच करावयाची तर गीतेवर प्रवचन करणारे आचार्य विनोबा, ती लिहून काढणारे पूज्य साने गुरुजी - किंवा रामायणासारखा अवीट विषय, त्यावर 'ग. दि. मा. ' यांच्यासारख्या कवीने गीते लिहिणे आणि सुधीर फडके यांच्यासारख्या गायकाने ती सादर करणे, या घटनांशी करावी लागेल व त्यात अतिशयोक्ती होणार नाही.
'दासबोध चिंतनिका' या ग्रंथात दासबोधातील सर्व समासांवर चिंतन करण्याची एक दिशा डॉ. देशमुख यांनी दाखविली आहे. यात ओव्यांचा अर्थ बहुतांशाने दिला असला तरी सार्थ दासबोधाला पर्यायी ग्रंथ असे याचे स्वरूप नाही, हे वाचकांनी प्रथम ध्यानात घ्यावे. तथापि दासबोधातील प्रमुख संकल्पना (concepts) वर अधिकच प्रकाश या ग्रंथामुळे पडू शकतो. उदा. द. ३-१० मध्ये वैराग्य निरूपणात 'भ्रांती' हा शब्द आला आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना भ्रांतीचे पाच प्रकार शास्त्रात सांगितले आहेत ते या ग्रंथात पाहावयास मिळतात. १) जगत् सत्यत्व भ्रांती २) भेद भ्रांती ३) कर्तृत्व भोक्तृत्व भ्रांती ४) संग भ्रांती ५) विकार भ्रांती. या सर्वांचे स्पष्टीकरण झाल्यामुळे भ्रांतीची संकल्पना स्पष्ट होते. ग्रंथाच्या प्रारंभी श्रीसमर्थांनी - 'नासे अज्ञान दुःख भ्रांती।' असे जे ग्रंथवाचनाचे फळ सांगितले आहे त्याचा खरा अर्थ या वेळी ध्यानात येतो.
दृष्टांत देतानासुद्धा एकदम वाचकाच्या मनाची पकड घेणारे दृष्टांत यात आहेत. पढतमूर्खाचे लक्षण सांगताना 'सिगारेट पाकिटावरील धोक्याची सूचना वाचूनसुद्धा ती ओढण्याचा प्रयत्न करतो तो पढतमूर्ख' असे वाक्य डॉ. देशमुख सहजी सांगून जातात. 'स्वगुणपरीक्षा ही दासबोधातील एक कादंबरीका असून हि शोकांतिका वाचून आपले जीवन दुरुस्त न करणारा विरळा' अशा शब्दात या चार समासांचे मार्मिक स्पष्टीकरण करून त्यांचे औचित्य प्रगट करतात.

## ग्रंथातील काही भाग -

## दशक १ - स्तवनांचा

ग्रंथलेखनाला आरंभ करण्यापूर्वी बुद्धीचे दैवत श्रीगजानन, सरस्वती व श्रीगुरू यांना नमन करण्याची आपल्या संस्कृतीची पद्धत आहे. त्याने त्या देवतांचा अनुग्रह होऊन ग्रंथ निर्विघ्नपणे पार पडतो. योग्य अर्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य मिळते व आत्मज्ञानाचा लाभ होतो. स्तवनाच्या निमित्ताने स्वतःचा अहंकार बाजूला ठेवून दुसऱ्याचे श्रेष्ठत्व मान्य करण्याची सवय लागते. अहंकारलयाच्या दृष्टीने स्तवनांचा हा फार मोठा लाभ आहे. एरवी सामान्य माणसाची विचारधारा स्वतःभोवती घोटाळत राहते व स्वतःच्या संदर्भात जगाकडे बघण्याची सवय लागते. या स्तवनांचा हेतू 'ऐसा गणेश मंगळमूर्ती। तो म्यां स्तविला यथामति। वांछा धरुनिया चित्ती। परमार्थाची॥' ह्या ओवीमध्ये स्पष्टपणे व्यक्त झाला आहे. कृतज्ञता हा माणसाचा खास गुण आहे. ज्यांच्यामुळे आपणास मानवी जीवन मिळाले, बुद्धीचा लाभ झाला व ज्ञानाची प्राप्ती झाली त्यांचेविषयी कृतज्ञता समर्थांनी स्तवनांच्या दशकाच्या माध्यमातून व्यक्त केली आहे.

समास - १ ग्रंथारंभलक्षण -

(ओवी क्र. २७ ते ३८) या ग्रंथाचे यथार्थ श्रवण करून त्याप्रमाणे प्रत्यक्ष आचरण करावयास सुरवात केली असता सर्व तऱ्हेची चुकीची कर्मे थांबून सत्कर्मे हातून घडू लागतात. मन संशयरहित होते. व्यावहारिक व पारमार्थिक यशाचा सोपा मार्ग स्पष्ट दिसतो. फार अवघड परमार्थाचे सायास न करता सायुज्यमुक्तीचा अनुभव येऊ शकतो.
पुत्रधनादी प्राप्तीच्या हेतूने या ग्रंथाची रचना केली नसून देहबुद्धीचे धोके, संसाराचे उद्वेग, संशयाने होणारी फजिती इत्यादींचे निवारण करून मनाला विश्रांती व समाधान मिळावे हा हेतू आहे. एवढे सांगूनही कुणाचा मत्सर कमी होत नसेल तर त्याला त्याचे तसे फळ मिळेल.

दशक १, समास ३ शारदास्तवन -

या समासामध्ये समर्थांनी मायारुप शारदेची विविध अंगे स्वतःच्या खास शैलीने सांगितली आहेत. त्यात अनेक विचार कूट पद्धतीचे आहेत. ह्या सर्व विचारांचे यथार्थ चिंतन झाले असता मायेच्या व्याप्तीची व सूक्ष्मत्वाची परीपूर्ण कल्पना येईल. या संदर्भात जे जे सापेक्ष, जे जे विशेषांसह व कल्पनेच्या प्रांतातील ते ते सर्व शारदेचे रूप आहे असे समजावे. ओवी १) प्रथम वेदांची माता असलेल्या, ब्रह्मापासून प्रकट झालेल्या शारदेला समर्थ वंदन करतात. वेद हा शब्दांचा समुदाय आहे. स्वरयंत्रातून ध्वनीरुप प्राणशक्ती बाहेर पडून ती दात, टाळू, जिव्हामूल इत्यादी आठ ठिकाणांहून उडी घेऊन शब्दरूप बनते. त्यामुळे शब्द मायिक ठरतो. त्या शक्तीला शारदा असे नाव दिले आहे. -- ५) जीवन्मुक्त महंतांना जगत् बाधित केल्यावर जो शांतीचा अनुभव येतो तो शारदेचाच असतो. कारण त्या शांतीमध्ये अविद्यालेश शिल्लक असतो. कारण ही शांती निरामय शांतीच्या सापेक्ष असल्याने मायिकच आहे. शारदा ही ईश्वराची अघटित घटनापटीयसी अशी शक्ती आहे. ज्ञान झाल्यानंतर जगताचा बाध होऊनही जो जगताचा अनुभव येत राहतो, त्याही विषयाची विरक्ती हे त्या ज्ञान्यांचे वैभव असून ते जगत् सापेक्ष असल्याने शारदाच आहे. जग दिसत असूनही प्रत्यक्ष ते नसल्याचा निश्चय असणे म्हणजे जगताचा बाध होय. -- १४) तीन वाणींच्या माध्यमातून स्फुरणारे शब्दभांडार वैखरीवाणीवाटे प्रत्यक्ष बाहेर पडते. म्हणून शब्दांचे सर्व कर्तृत्व शारदेचे आहे. एकूण चार वाणी आहेत. १) परा - ही ज्ञानप्रधान असून महाकारण देहाश्रित व मूलाधार चक्रामध्ये राहते. गुप्तविचार हे तिचे स्वरूप आहे. २) पश्यंती - ही मनःप्रधान असून कारण देहाश्रित व स्वाधिष्ठान चक्रामध्ये राहते. ३) मध्यमा - बुद्धिप्रधान असून लिंगदेहाश्रित मणीपूर चक्रामध्ये राहते. ४) वैखरी - प्राणशक्ती प्रधान क्रियारुप आहे. परेमध्ये विचार गुप्तरुपाने असतो. पश्यंतीमध्ये तो अस्पष्ट असतो. मध्यमेत विचार स्पष्ट होतो आणि वैखरीत तो शब्दरूपाने व्यक्त होतो.

दशक १, समास ४, सद् गुरुस्तवन -

-- इत्यादी प्रकारे श्रीगुरुंचे केलेले वर्णन या समासात मार्मिकपणे केले आहे. तत्वदृष्ट्या श्रीगुरू ब्रह्मरूप असून व्यवहारदृष्ट्या ते सगुणसाकार आहेत. समर्थांचे श्रीराम हे सद्गुरू होते. सद्गुरुस्तवनाच्या या समासात शास्त्रमर्यादा सांभाळून समर्थांनी श्रीरामाचा कुठेही उल्लेख केला नाही. ऐतरेय उपनिषदात 'तस्मादिदन्द्रो नामेदन्द्रो ह वै नाम' असा मंत्र आहे. (ऐ. १-३-१४) या मंत्रामध्ये इंद्राला प्रत्यक्ष इंद्र न म्हणता 'इदन्द्र' असे म्हटले आहे. यावर भाष्य करताना श्रीमत् शंकराचार्य म्हणतात - 'अतिशय पूज्य व्यक्तीचे प्रत्यक्ष नाव घेणे

त्यांच्या भक्ताला संकोच निर्माण करते'. त्यामुळे प्रत्यक्ष नाव घेण्याचा शिष्टसंप्रदाय नाही. इतर अनेक ठिकाणी उपासनेच्या निमित्ताने समर्थांनी रामनामाचा केलेला उच्चार हा राम या उपास्य दैवताचा आहे. या समासात मात्र श्रीगुरुरुप रामाचे वर्णन असल्याने त्यांनी श्रीरामाचा नामोल्लेख केला नाही.

ओवी १ त ५ या पाच ओव्यांत ब्रह्मरूप श्रीगुरुंना मायेचा स्पर्श होत नसल्याने व मायेत उतरल्याशिवाय वर्णन करता येत नसल्याने आपली झालेली अडचण व्यक्त केली आहे. ---

दशक १० समास ७ सगुण भजन

मागील समासातील शेवटच्या प्रश्नाचे उत्तर ओवी क्र. ७ व ११ मध्ये समर्थ देतात. ७) 'भावबळे आकळे। येरवी नाकळे॥' या ज्ञानदेवांच्या म्हणण्याप्रमाणे ज्याचा भाव अतिशय बलवान असतो त्याला त्याच्या भावाप्रमाणे वायुरुप शरीर धारण करून असलेले महात्मे अनुभव देतात. भाव नसताना केवळ कल्पनेचे खेळ झाल्याने जो अनुभवाचा भास होतो त्यात काहीच अर्थ नसतो. स्वप्न व तो भास यात काही फरक नसतो. ११) महान संत समाधी घेतल्यानंतरही (देहत्याग) पाठीमागून चालणाऱ्या सामर्थ्यरुपाने असल्याचा अनुभव येतो. त्यांच्या पुण्याईच्या प्रभावामुळे असे होते. समर्थांनीच अंतकाळी म्हटले होते -

माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी। परी मी आहे जगज्जीवनी। निरंतर॥

(१२ ते २३) पुण्याचा हा प्रभाव लक्षात घेऊन प्रत्येकानेच पुण्याचरण करावे. एक दैवत व एक गुरू यांचेवर दृढ श्रद्धा ठेवावी. सगुण सांभाळून निर्गुणाचे चिंतन करीत जावे. सगुणाची अगर निर्गुणाची उपासना निष्काम बुद्धीने केलेली असावी. सकाम उपासनेने क्षुल्लक फळ मिळते. निष्काम उपासनेने ब्रह्मज्ञान होते. या दोन्हींमध्ये फळाच्या दृष्टीने प्रचंड अंतर आहे. निष्काम भजनाने फार मोठे सामर्थ्य मिळते व भक्ताच्या भावाप्रमाणे त्याचे मनोगत देवच पूर्ण करतो. 'तयांचे कायीयेक सांगी। तें मी करी॥' असे ज्ञानदेव याच अर्थाने म्हणतात.

***